वाहतुक शाखा, पुणे शहर
पोलीस उप आयुक्त, वाहतुक यांचे कार्यालय,
बंगला नं ६ येरवडा पोस्ट ऑफीस शेजारी, पुणे

जावक क्रमांक –पोउपआ/वाह/नियो./ ४९३४ /२०२३ दिनांक :- १०/०७/२०२३

## प्रेसनोट

पुणे शहरातील खडकी वाहतुक विभागाचे हद्दीत महाराष्ट्र मेट्रो रेल कार्पोरेशन लि. यांचेतर्फे मेट्रोचे काम सुरु असल्याने चर्च चौक ते बोपोडी चौक असा एकेरी मार्ग करण्यात आला आहे. बोपोडी चौक ते चर्च चौक दरम्यान प्रलंबित असलेली सर्व कामे १५/०८/२०२३ रोजीपर्यंत पुर्ण करुन बोपोडी चौक ते चर्च चौक दरम्यान दुहेरी वाहतूक सुरु करण्याचे नियोजन आहे.

वाहनचालकांच्या सोईकरीता बोपोडी चौक ते सी.एफ.व्ही.डी. (फुटबॉल मैदान) दरम्यान दुचाकी व तीनचाकी वाहनांना प्रायोगिक तत्वावर परवानगी देण्यात आली होती. परंतू जुना मुंबई पुणे महामार्गावर बोपोडी चौक ते सी.एफ.व्ही.डी. (फुटबॉल मैदान) दरम्यान मेट्रो स्टेशनचे काम सुरु आहे. त्याचप्रमाणे याच रोडवर चर्च चौक ते बोपोडी चौक दरम्यान पाईपलाईनचे काम सुरु होणार असून त्यामुळे बोपोडी चौक ते सी.एफ.व्ही.डी. (फुटबॉल मैदान) दरम्यान रोडची रुंदी कमी होवून दुहेरी वाहतूक सुरु ठेवल्याने वाहतूक कोंडी अगर एखादा अपघात होण्याची शक्यता आहे. याकरीता महाराष्ट्र शासन गृह विभाग क्र.एम.व्ही. ए.०१९६/८७१/सीआर-३७/टीआरए-२, दिनांक २७/०९/१९९६ चे नोटीफिकेशननुसार मोटार वाहन कायदा कलम ११५, ११६(१)(ए) (बी), ११६(४) आणि ११७ अन्वये मला प्राप्त झालेल्या अधिकाराचा वापर करुन मी विजयकुमार मगर, पोलीस उप-आयुक्त, वाहतुक, पुणे शहर, खडकी वाहतूक विभागातील बोपोडी चौक ते चर्च चौक दरम्यान प्रवास करणाऱ्या दुचाकी व तीनचाकी वाहनांकरीता यापुर्वी या कार्यालयाकडील जाक्र. पोउआ/वाह/२७३४/२०२३, दि. ०६/०४/२०२३ रोजी अन्वये प्रायोगिक तत्वावर परवानगी दिलेबाबतचे तात्पुरते आदेश रद्द करण्यात येत असून खालीलप्रमाणे आदेश निर्गमित करीत आहे.

### खडकी वाहतूक विभाग पुणे अंतर्गत

➢ बोपोडी चौकातून पुणेचे दिशेने (चर्च चौकाकडे) जाणाऱ्या सर्व प्रकारच्या वाहनांना बंदी करण्यात येत आहे.

**पर्यायी मार्ग :-**

✓ बोपोडी चौक, डावीकडे वळून खडकी बाजार, एम.एस.ई.बी. चौक, उजवीकडे वळून चर्च चौक

( विजयकुमार मगर )
पोलीस उप-आयुक्त, वाहतूक
पुणे शहर

प्रति, :-१. जिल्हा प्रसिध्दी अधिकारी पुणे-१,स्थानिक वृत्तपत्रात बातमी स्वरुपात प्रसिध्दी देणेकामी.
२. सहाय्यक पोलीस आयुक्त,परिमंडळ- २,३ वाहतुक शाखा पुणे शहर
३. प्रभारी अधिकारी खडकी वाहतूक विभाग, वाहतुक शाखा पुणे शहर

Scanned with OKEN Scanner